## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे -१८

## ( महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल )

## सुचना

क्रमांक- नरवि / कावि /१५ /930/२०१८

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विकास नियंत्रण नियमावली महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्रमांक टीपीएस- १८९०/ सीआर-८९/९०/ नवि-१३, दिनांक १७ डिसेंबर १९९० अन्वये मंजूर आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास नियंत्रण नियमावली महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, अधिसुचना क्रमांक टीपीएस- १८९४/ ३३२७ / नवि-१३, दिनांक १६ डिसेंबर १९९९ अन्वये सुधारित करण्याच आलेली आहे. ( यापुढे " उक्त विकास नियंत्रण नियमावली " म्हणून संबोधिलेली );

आणि ज्याअर्थी, पुणे महानगर परिवहन महामंडळ यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस परीवहन महामंडळाच्या वापरातील / आरक्षित मिळकती विकसीत करण्यासाठी २.५ एफ.एस.आय. लागू करण्यासाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे कळविलेले आहे. ( यापुढे " उक्त प्रस्ताव " म्हणून उल्लेख केलेली );

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत उक्त प्रस्तावानुसार पी.एम.पी.एल. चे मिळकतीमध्ये वाणिज्य वापर अनुज्ञेय करण्यासाठी परिशिष्ट " झेड " नव्याने समाविष्ट करण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चें कलम ३७ अन्वये फेरबदल करण्याचे योजिल आहे. ( यापुढे " उक्त फेरबदल " म्हणून संबोधिलेला );

आणि ज्याअर्थी, पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने महापालिका सभा, ठराव क्र. ३०६, दिनांक २७ जुन २०१३ अन्वये उक्त विकास नियंत्रण नियमावलीमध्ये महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. ( यापुढे " उक्त ठराव " म्हणून संबोधत केलेला );

आणि ज्याअर्थी, फेरबदलाचा प्रस्ताव नागरिकांच्या अवलोकनार्थ उपसंचालक, नगररचना, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११०१८ यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत ठेवण्यात आलेला आहे.

उक्त फेरबदलाबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सुचना असतील तर त्या सदरची सुचना महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रात प्रसिध्द झाल्यांच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत लेखी स्वरुपात आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे – ४११०१८ यांचे कार्यालयाकडे पाठवाव्यात.

उक्त प्रस्तावित फेरबदलाबाबत विहित मुदतीमध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे प्राप्त हरकती / सुचनाचा विचार फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीसाठी सादर करण्यापुर्वी केला जाईल.

- सही -
( श्री. श्रावण हर्डीकर )
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी, पुणे – ४११०१८

ठिकाण:- पिंपरी
दिनांक:-०४/०५/२०१८
जाहिरात क्र. १२७९

( टीप:- सदर सुचना व उक्त फेरबदलाचा प्रस्ताव पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.)

सत्यप्रत

उप संचालक नगररचना
नगररचना व विकास विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

# PIMPRI CHINCHWAD MUNICIPAL CORPORATION

## Modification proposed under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966

## Notice

No:- TOS/WS/15/130/2018

Whereas the Development Control Rules for the Pimpri Chinchwad Municipal Corporation has been sanctioned by the Government of Maharashtra, Urban Development Department vide Notification No- TPS-1890/619/CR-89/90/UD-13, dated 17th December 1990 and which was further amended by the Government of Maharashtra, Urban Development Department vide Notification No- TPS-1894/3327/UD-13, dated 16th December 1999 ( hereinafter referred to as " the said Development Control Rules ");

And whereas, the Pune Mahanager Parivahan Mahamandal Ltd., requested Pimpri Chinchwad Municipal Corporation to undertake modification procedure as per provision laid down under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to the said Development Control Rules to make rule for allowing development of plots for P.M.P.M.L. use and reserved for their use with 2.5 F.S.I. ( hereinafter referred to as " the said Proposal ");

And whereas, the Pimpri Chinchwad Municipal Corporation intends the modification procedure as per provision laid down under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 to the said Development Control Rules as per the said Proposal to include Appendix " Z " to use the properties of P.M.P.M.L. for commercial use. ( hereinafter referred to as " the said Modification ");

And whereas, the General Body of Pimpri Chinchwad Municipal Corporation has now passed the resolution vide Resolution No: 306, dated 27.06.2013 to effect the said Modification to the said Development Control Rules under section 37 of Maharashtra Regional and Town Planning Act, 1966. ( hereinafter referred to as " the said Resolution ");

And whereas, the copy of the said modification is kept open for public inspection on all working days during office hours in the office of Deputy Director of Town Planning, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune – 411018.

Any person having any suggestion and / or objection regarding the said Modification may file the same in writing to the Commissioner, Pimpri Chinchwad Municipal Corporation, Pimpri, Pune – 411018 within a period of one month from the date of publication of this notice in the gazette of Maharashtra Government.

The suggestion and / or objection recived with in the stipulated period will be considered by the Municipal Corporation before submitting the proposal to Government of Maharashtra for sanction.

sd/-

( Mr. Shravan Hardikar )

Commissioner,

Pimpri Chinchwad Municipal Corporation,

Pimpri, Pune – 411018

Place- Pimpri

Date- 09/05/2018

( Notes:- The said Notification & Modification proposal is also available on the website of P.C.M.C. – www.pcmcindia.gov.in )

True Copy